पुण्य नगरी

# अकोल्यात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

## क्विक हिल सायबर वॉरियर क्लबचा पुढाकार; सरस्वती खंडेलवाल इंग्लिश स्कूलमध्ये जनजागृती

**अकोला, ता. २८ :** शंकरलाल खंडेलवाल कॉलेज, अकोला येथील क्विक हिल सायबर वॉरियर क्लब तर्फे " सायबर शिक्षा सायबर सुरक्षा" अभियानांतर्गत दिनांक २४/०७/२६ रोजी सरस्वती खंडेलवाल इंग्लिश स्कूल, अकोला येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. "माझा डेटा माझी जबाबदारी" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षित डिजिटल सवयी विकसित करणे हा होता.

सायबर वॉरियर्स कु. चंचल राजेश निंबाळकर व कु. ईश्वरी प्रवीण मोकळकर यांनी सादरीकरण, प्रत्यक्ष उदाहरणे, प्रश्नमंजुषाच्या



माध्यमातून कार्यक्रम घेतला, ज्यामध्ये ऑनलाइन गेमिंग, चॅट जीपीटी चा अतिवापर केवायसी फसवणूक, एआय व्हॉइस क्लोनिंग, ऑनलाइन शॉपिंग फसवणूक, डिजिटल अरेस्ट फसवणूक, फिशिंग, लोन ॲप फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षा, नोकरीच्या आमिषाने होणारी फसवणूक, ओटीपी फसवणूक, फोटो मॉर्फिंग, लॉटरी व बक्षीस फसवणूक आणि क्रेडिट/डेबिट कार्ड फसवणूक याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हा कार्यक्रम सौ. धनश्री पांडे (मुख्याध्यापिका, सरस्वती खंडेलवाल इंग्लिश स्कूल, अकोला) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग या कार्यक्रमास उपस्थित होते.

मुख्याध्यापिका यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे समाज अधिक जागरूक आणि सुरक्षित बनतो. सुरक्षित डिजिटल भविष्यासाठी प्रत्येकाने ही सवय अंगीकारली पाहिजे. क्विक हिल सायबर वॉरियर क्लब, शंकरलाल खंडेलवाल कॉलेज, अकोला हा विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली चालणारा सायबर जनजागृती उपक्रम असून तो क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहकार्याने राबविण्यात येतो. या अभियानाला अध्यक्षा अनुपमा काटकर आणि सहयोगी संचालक अजय शिर्के (क्विक हिल फाउंडेशन पुणे) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.